# सृजन

वसंत गिरटकर.

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
स. क्र. १४९०
९२५८

REFBK-0010589
REFBK-0010589

श्री. वसंत गिरटकर

यां चीं

## आगामी आकर्षणें

१ मधुचंद्र

– गोडगोड भावगीतांचा संग्रह

∴

२ ओहण

– लघुकथांचा संग्रह

∴

३ वळण वहाट

– लोकगीतांचा अभिनव संग्रह

# सृजन

वसंत गिरटकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

REFBK-0010589
REFBK-0010589

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 
ग्रंथ संख्या (स्थळ प्रत)

मूल्य दोन रुपये

सेवा प्रकाशन
नागपूर

प्रकाशक :
'सेवा' प्रकाशन, नागपूर.

प्रथमावृत्ति
फेब्रुवारी १९५८

सर्व हक्क कवीचें स्वाधीन.

मुद्रक :
किसनलालजी मुंदडा,
गुरुदेव मुद्रणालय,
महाल, नागपूर २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २३८९९ दि ३/५५
क्रमांक ९८९० नों. दि ८/१०/५५

—ज्यांच्या कडून आनुवंशिकतेने
वाचनाचा अन् लेखनाचा वारसा
माझेकडे आला—ते माझे वडील—
कै. गुजाबराव गिरटकर यांचे
स्मृतीस सादर समर्पण.....

वसंता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथक्रमांक
अनुक्रम क्रमांक ... वि: ... नों: दि: ...

# स्वागत

श्रीयुत वसन्त गिरटकर या नवोदित कविमित्रांच्या सृजनाचें (कीं सर्जनाचें ?) आज अनपेक्षित स्वागत करतांना मला अतिशय आनंद होत आहे; तसाच तो रसिकांना होईल अशी माझी अपेक्षा आहे. 'अनपेक्षित स्वागत' असें मी म्हणतों. याला कारण आहे. सुमारें दहा बारा वर्षांपूर्वी मी यवतमाळला शारदाश्रमांत व्याख्यान देण्याकरितां गेलों होतों. त्यावेळीं मी शारदाश्रमाचे संस्थापक सुप्रसिद्ध इतिहास संशोधक पूज्य अप्पासाहेब देशपांडे यांचा पाहुणा होतों. गिरटकर हे तेव्हां माझ्या भेटीस आले होते. यवतमाळचे सुविख्यात सव्यसाची साहित्यिक श्रीयुत वामनराव देशपांडे, कवि बापूसाहेब हूड आणि लोकगीतकार श्रीयुत पांडुरंग श्रावण गोरे यांच्या मेळाव्यांत वावरणारे आणि कवितेचा नाद असणारे एक तरुण विद्यार्थी म्हणून त्यांच्याशीं माझी ओळख करून देण्यांत आली होती. त्या प्रसंगीं गिरटकरांनी मला आपल्या कांही कविताहि दाखविल्या होत्या. परंतु या मधल्या काळांत त्यांचा तो आरंभीचा सुगंध माझ्या स्मृतिसंपुटांतून उडून गेला होता. आज ज्यावेळीं श्रीयुत गिरटकर यांनी माझी दुसऱ्यांदा भेट घेतली; आणि त्यांनी आपल्या कवितांची 'मुद्रित नमूना प्रत' माझ्या हातांत दिली, त्यावेळीं मला त्यांच्या त्या पहिल्या भेटीची व जुन्या कवितांची आपोआप आठवण झाली. प्रस्तुत कवितासंग्रहांत त्या प्रारंभिक कवितांपैकी एकहि कविता अंतर्भूत करण्यांत आलेली नाहीं. परंतु बालांचें बालपण संपून तीं तारुण्यांत पदार्पण करतीं झालीं, तरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. ग्रंथक्रमांक
अनुक्रम क्रमांक ........ दि: ........ नों: दि: ........

# स्वागत

श्रीयुत वसन्त गिरटकर या नवोदित कविमित्रांच्या सृजनाचें (कीं सर्जनाचें ?) आज अनपेक्षित स्वागत करतांना मला अतिशय आनंद होत आहे; तसाच तो रसिकांना होईल अशी माझी अपेक्षा आहे. 'अनपेक्षित स्वागत' असें मी म्हणतों. याला कारण आहे. सुमारें दहा बारा वर्षांपूर्वी मी यवतमाळला शारदाश्रमांत व्याख्यान देण्याकरितां गेलों होतों. त्यावेळीं मी शारदाश्रमाचे संस्थापक सुप्रसिद्ध इतिहास संशोधक पूज्य अप्पासाहेब देशपांडे यांचा पाहुणा होतों. गिरटकर हे तेव्हां माझ्या भेटीस आले होते. यवतमाळचे सुविख्यात सव्यसाची साहित्यिक श्रीयुत वामनराव देशपांडे, कवि बापूसाहेब हूड आणि लोकगीतकार श्रीयुत पांडुरंग श्रावण गोरे यांच्या मेळाव्यांत वावरणारे आणि कवितेचा नाद असणारे एक तरुण विद्यार्थी म्हणून त्यांच्याशीं माझी ओळख करून देण्यांत आली होती. त्या प्रसंगीं गिरटकरांनी मला आपल्या कांही कविताहि दाखविल्या होत्या. परंतु या मधल्या काळांत त्यांचा तो आरंभीचा सुगंध माझ्या स्मृतिसंपुटांतून उडून गेला होता. आज ज्यावेळीं श्रीयुत गिरटकर यांनी माझी दुसऱ्यांदा भेट घेतली; आणि त्यांनी आपल्या कवितांची 'मुद्रित नमूना प्रत' माझ्या हातांत दिली, त्यावेळीं मला त्यांच्या त्या पहिल्या भेटीची व जुन्या कवितांची आपोआप आठवण झाली. प्रस्तुत कवितासंग्रहांत त्या प्रारंभिक कवितांपैकी एकहि कविता अंतर्भूत करण्यांत आलेली नाहीं. परंतु बालांचें बालपण संपून तीं तारुण्यांत पदार्पण करतीं झालीं, तरी

ज्याप्रमाणे वडिलधाऱ्या माणसांच्या मनांत त्यांच्या बाळपणाच्या स्मृति कायम राहतात, त्याप्रमाणे कांहीसा प्रकार त्या प्रारंभिक कवितांबाबत माझा झाला आहे. या कवितासंग्रहांत मात्र गिरटकरांतला 'तरुण कवि' शब्दाशब्दांतून आणि अक्षराअक्षरांतून प्रकट झाला आहे.

गिरटकरांच्या या कविता संग्रहांतील कवितांची संख्या सत्त-राच्या आसपास आहे. आणि कांही तुरळक कवितांचे अपवाद वगळले, तर बहुतेक सर्व कविता प्रणयाला वाहिलेल्या आहेत. आणि मनुष्य स्वभावाच्या दृष्टीने त्या तशा प्रणयपर असणे साह-जिक आहे. कळी स्वतःच्या ठिकाणीं केव्हा व कशी उमलते हें जसें वेलीस कळत नाही किंवा खनीच्या खणांत दडलेल्या हिऱ्याला जसें आपले प्रकाश किरण आपणांस उघड करीत आहेत हें समजत नाही; तसेच प्रणय हा आपल्या अंतरंगांत केव्हां, कोठून आणि कसा शिरतो व तें रंगवत बसतो हें मनुष्याच्या सहसा लक्ष्यांत येत नाही. प्रणय हा मनुष्याच्या अंतरंगांत प्रवेश करतांना ही स्त्री व हा पुरुष असा भेदभाव करीत नाही अथवा त्यांच्या वयाचाहि विचार करित नाही. त्यामुळे साहजिकच प्रणयपर कविता ही सर्वांना सारखीच प्रिय असते.

गिरटकरांच्या कांहीं प्रणयपर कविता आत्मवृत्तात्मक तर कांही नाटयात्मक आहेत. 'तुझ्या भाजी भाकरीस' ही कविता पहिल्या प्रकारांत मोडेल, तर 'हौस' या कवितेचा समावेश दुसऱ्या प्रकारांत होईल. पहिल्या कवितेंतला प्रणयभाव शांत व उपशामक आहे. उलट दुसऱ्या कवितेंत तो अनिर्बंध व स्वच्छंद आहे.

मात्र या दुसऱ्या प्रकारासाठीं कवि मानसशास्त्रवेत्ता व कलावंत असावा लागतो. अन्य स्त्री पुरुषांच्या भावनांना तोंड फोडतांना त्याला त्यांच्या मनांचा आविष्कार कलात्मक रीतीनें करावा लागतो. तें सामर्थ्य गिरटकरांच्या लेखणीत प्रत्ययास येत नाही वानगी दाखल वरील दुसरी कविता घ्या. तिच्यांत 'एक स्वैरिणी' आपल्या 'प्रियकरा' कडे येण्याचें धाडस करते. परंतु त्यांत तिच्या मनाची आविष्कृति झालेली नाहीं. गिरटकरांनी फक्त तिच्या 'वासनेचे' चित्र रेखाटलें आहे. तें सत्य व सुंदर आहे. परंतु त्यांत प्रतिभेचें तेज नाहीं. या प्रणयाच्या उत्सर्जनापेक्षा त्यांनी प्रणयाच्या विसर्जनाचें चित्र रेखाटलें असतें, तर त्यांत त्यांच्या प्रतिभेला रंग भरण्यास अवसर सापडला असता. या बाबतींत एक इंग्रज टीकाकार म्हणतो,–"The character of a woman comes to the surface not when love begins but when love ends." हा त्याचा सिद्धान्त पुरुषाच्या स्वभावालाहि तितकाच लागू पडतो. कारण प्रेम फुलत असतांना उभयपक्षीं गोड वागणूक आणि सुखद व्यवहार स्वाभाविक असतो. परंतु प्रेम ओसरूं लागलें म्हणजेच स्त्रीच्या अथवा पुरुषाच्या खऱ्या स्वभावाची पारख होते. त्यांत सोनें तावून सुलाखून निघतें आणि लोखंड गंजतें! श्री. गिरटकरांनीं अशा प्रकारच्या कविता लिहितांना या दृष्टीने विचार करावयास हवा असें मला वाटतें.

याचा अर्थ मी वासनामय प्रणयाचा तिरस्कार करतो अथवा त्याला गौण लेखतो असा मुळींच नाही. आपल्याकडे संस्कृत साहित्यकारांनीहि 'रति' भावनेला प्राधान्य दिलें असून 'शृंगाराला' रसराजा ही पदवी प्रदान केली आहे. कारण ही भावना सर्व जीव

कोटींत सदैव आढळते. तिच्या शिवाय जीवांचा विकास शक्य नाही. हें लक्ष्यांत घेऊनच एक विज्ञान वेत्ता म्हणतो;–"The sex instinct is in all likelihood the most permanentely unmanagable of all human impulses. International strife may conceivably be prevented by international agreement, and the economic struggle solved by regulations of births and solved by socialization of wealth, while the sex impulse will still be a source of acute individual happiness."

श्रृंगाराची परिपूर्ति म्हणजे वात्सल्य. त्या रसाच्या दोन तीन कविता प्रस्तुत संग्रहांत आहेत. श्री. गिरटकर हे जन्माने व व्यवसायाने कास्तकार आहेत. तेव्हां कास्तकाराच्या ग्रामीण जीवनांतील कांहीं संकेतांचा त्यांनी 'पायदळ' या वत्सल गीतांत उपयोग केला आहे. तो नागर रसिकांना कौतुकास्पद वाटेल. त्या गीतांतील 'मायाळू माय,' 'शेजारचा गुरव,' 'अंबाबाई,' 'भंगराई,' 'मरीमाय' इत्यादिकांना काकुळती येऊन विनवीत आहे!

या शिवाय गिरटकरांच्या तीन चार कविता भक्तिपर व तात्विक आहेत. त्यापैकीं दोन कविता मला विशेष आवडल्या. एक कविता 'प्रवासा'वर आहे. त्यांतला प्रवासी ध्येयवादी आहे. गिरटकर सांगतात;—

**चाललासे कुठेतरी नाही गांव आणि शींव**
**दूर दूर...जावयाचें...फक्त हाच एक ठाव!**

रात्र माजली भयाण दिसेनासा झाला पथ
काठी टेकीत टेकीत चालला हा श्रांत पांथ!
परी, ध्रुवताऱ्यावरी दृष्टि ठेवितो अढळ !
आणि क्रमितो आपुला मार्गरुक्ष, डोंगराळ!

कदाचित् हा प्रवासी स्वतः गिरटकरच असावेत. शंभर झोपडयांच्या एका आडवळणी खेडयांत त्यांचें वास्तव्य आहे. तेथें काव्य लेखनाचें ध्येय गांठण्याचें त्यांचें प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी आवश्यक असणारीं वाचनालयें, सभासंस्था, साहित्यिकांचा सहवास इत्यादि साधनांचा त्या ठिकाणीं अभाव असल्यामुळे 'प्रवासी आपला रुक्ष डोंगराळ मार्ग क्रमीत आहे', असें ते म्हणत असावेत. खेडयाच्या वास्तव्यांत प्रतिभेला स्वभावतःच मर्यादा पडतात. प्रतिभा ही जन्मजात असली, तरी तिच्यावर शिक्षणाचें संस्कार लागतात. गिरटकरांचें शिक्षण प्रतिकूल परिस्थितींत फारसें झालेलें नाहीं. तेव्हां साहाजिक त्यांच्या कवितेंत त्याच त्या विषयांची, भावनांची आणि रसांची पुनरुक्ति झाली आहे. त्यांत शृंगार अनेकदां आवृत्त झाला आहे, हें मागें सांगितलेंच आहे. क्वचित् त्यांत कांही अनुचित कल्पना शिरल्या आहेत. आणि क्वचित् व्याकरण दृष्टया दुष्ट प्रयोग घडले आहेत.

'प्रवासी' ही वर उल्लेखिलेली कविता जशी थोडीशी वेगळी आहे. तशीच 'मरणास' ही कविता निराळी आहे. कवि 'मरणास' म्हणतो;–

ये ये ये ये, ये तूं मरणा !
घालुन निज सुंदर आभरणा

सरे न इथले दाणापाणी
पण दुनिया ही चीज किराणी !
खचित मला तूं सुखकर राणा !

परंतु या दोन्ही कवितांत औदासिन्य असलें, तरी तें रम्य आहे. कारण त्यांचा शेवट आशावादांत झाला आहे. कदाचित् कवीच्या जीवनांत मधून मधून निराशेचे क्षण येत असावेत. परंतु तो जात्याच आशाळू असल्यामुळे त्याच्या मनाच्या आकाशावर तीं अभ्रें फार वेळ टिकत नसावीत. कवि जसा आशावादी तसाच विशाल दृष्टीचा आहे हें या सुंदर गीतावरून स्पष्ट होईल:—

'विशाल या क्षितिजाच्या पुढती करांत कर चल गुंफुन जाऊं
तृणावृता भू, नव नीलांबर सदा मोकळें अंगण पाहूं !
नको घराच्या चार भिंतिचें जाचक बंधन मला तुला हें
मंदसमीरण, निर्झरगायन खुल्या मोकळ्या हवेंत राहूं
या बाजारी जगापासुनी किती योजनें दूर असावें—
असें वाटते मनास माझ्या दुःखांचें शत डोंगर साहूं

गिरटकरांच्या कवितेचा एक विशेष म्हणजे तिच्या अभिव्यक्तींतलें नवें पण व निराळें पण ! अत्याधुनिक कवितेचें अनुकरण हें त्याचें कारण नसून खेड्यांतलें त्यांचें जीवन त्यास कारणीभूत असावे. अर्थात् हें नवेंपण व निराळें पण त्यांनीं निसर्गाचीं जीं शब्दचित्रें चितारलीं आहेत त्यांत प्राचुर्याने प्रत्ययास येते. त्यांतलें हें एक चित्र पहा:—

ओघ नदीचा संथ रुपेरी
चमचम चमके ऐन दुपारीं
चकाकणाऱ्या पाण्यावरती
क्रीडा करिते कुणी जलपरी !
हळू गुदगुल्या करिती नाजुक
तिला लव्हाळे लवचिक साजुक
उठे शिरशिरी समग्र शरिरीं
पंख पसरतो वरीं धवल बक !

गिरटकरांच्या समग्र कवितेचें हे समीक्षण नाही. आमच्या भेटींत त्यांचें 'स्वागत' करतांना आसपासच्या रसिकांना करून दिलेली ही 'तोंड ओळख' आहे. त्यांनी हा कवितासंग्रह स्वतः वाचावा आणि 'पूर्ण परिचय' करून घ्यावा अशी विनंति आहे.

—भवानीशंकर पंडित

श्रीधर सदन-श्रद्धानंदनगर,
दक्षिण अंबाझरी मार्ग,
नागपूर-अजनी.
मंगळवार दि. ७ जानेवारी १९५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23789 दि: 3.1.64
क्रमांक 9.6.20 नों: दि: 8.1.64

## पुरस्कार

श्री. वसंतराव गिरटकर यांच्या 'सृजना'तील कविता मी उत्सुकतेने वाचल्या आणि त्यातील रचनालालित्याने आनंदून गेलो. खेडेगावात राहणाऱ्या एका तरुण कवीच्या अंतःकरणातील विविध भावनांचा मंद गंध सेवन करून मनाला उल्हास वाटला. कवि शहराच्या वातावरणातील असो किंवा खेड्यातील असो त्याच्या अंतःकरणाचा तारुण्यातील स्थायिभाव 'रति' त्याचा आढळ न होणे अस्वाभाविक ठरेल. श्री. गिरटकरांच्या काव्यात त्याचा प्रसन्न व शुभंकर अविष्कार झालेला आहे. पूर्व परिचयापासून तो मीलना-पर्यंतच्या आणि तदनंतर सुखी संसाराच्या भावना त्यांनी कलाकुशलतेने रेखाटलेल्या आहेत. तथापि केवळ 'रति' भावनेंतच ते रमले आहेत असे नाही. वात्सल्यानेहि त्यांच्या मनाला मोहिनी घातलेली आहे. क्वचित दुःखाचा स्पर्श झालेला आढळतो.

परमेश्वराच्या कल्पनेने त्यांना मधून मधून आपलेसे करून घेतलेले दिसते. पण ही भावना दुःखामुळे निर्माण होणाऱ्या अगतिकतेतून निश्चित आलेली नाही.

श्री. गिरटकर आपल्या मर्यादित का होईना पण जीवनाचा आनंद भरपूर प्यालेले आहेत आणि तोच त्यांच्या कवितातून ओसंडून वाहतो. निसर्गाच्या रमणीय दृश्यांत त्यांना ईश्वराचा साक्षात्कार होत असल्याच्या खुणा जागोजाग सापडतात. त्यांच्या अंतःकरणातील प्रसन्नतेचाच हा परिणाम होय.

श्री. गिरटकर हे तरुण कवि आहेत. आणि तरीहि त्यांचे काव्य नवकाव्याच्या दुर्बोधतेपासून पूर्णपणें अलिप्त आहे. अंतःकरणाला जे भिडले ते त्यांनी सरळपणे व्यक्त केलेले आहे आणि म्हणून ते रसिकांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोचते. त्यांच्या अनुभवांचा व्याप फार मोठा नाही. कांही विशिष्ट अनुभवाभोवती ते रुंजी घालतात. पण ते एका दृष्टीने स्वाभाविक आहे. आयुष्याची वाट बरीच चोखाळली गेली, म्हणजे जीवनाची ओळख व्यापक होते, अनुभवाचे क्षितिज विस्तारते, भावनांची संकुलता निर्माण होते–हे सर्व, काही काळानंतर गिरटकरांच्या काव्यात पुढेमागे पाहावयास सापडेल, अशा काही पुसट खुणा या लहानशा 'सृजनां'त आढळतात. तथापि सध्या जे आहे ते अत्यंत हृद्य आहे.

शब्दकळा–हा तर त्यांच्या कवितेचा एक रमणीय विशेष सांगता येईल. त्यांना जे व्यक्त करावयाचे आहे त्यासाठी

शब्द जणु त्यांच्यामागे धावून येतात. आणि कविता निर्माण होते. ही सहजता, ही अक्रमिमता पाहून मनास आल्हाद वाटतो. 'सृजन' काव्यातील त्यांची ही कविता जीवनाबरोबर जसजशी वाढत जाईल तसतसे तिचे नवीन आविष्कार होतील व ते रसिकांची अंत:करणे आपलीशी करून सोडतील याविषयीं मला शंका वाटत नाही.

धंतोली, नागपूर १ } —वि. भि. कोलते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५८९

## कृतज्ञता

माझा हा पहिलावहिला निवडक पासष्ठ कवितांचा संग्रह. एकोणवीसशे अठ्ठेचाळीस सालापासून तो आजपर्यंतच्या कांही कविता ह्यांत समाविष्ट करण्यांत आल्या आहेत. या कवितांपैकी कांहीं वेळोवेळी मासिकांतून आणि नियतकालिकांच्या दिवाळी अंकांमधून प्रकाशित झालेल्या आहेत. तद्वतच तीन कविता "प्रारंभ" ह्या कवितासंग्रहांतहि यापूर्वीच येऊन गेल्या आहेत.

प्रथमतः ज्यांनी ज्यांनी मला प्रोत्साहन देऊन आत्मियतेनें माझे कौतुक केलें. ते श्री. वा. ना. देशपाण्डे, सत्कवि पां. श्रा. गोरे, श्री. ना. ना. हूड, श्री. शरच्चंद्र टोंगो, डॉ. बाबासाहेब नंदुरकर ह्या सर्वांच्या ऋणांतून मुक्त होण्याची माझी मुळीच मनिषा नाही. त्यांतच सदैव डुंबून राहावे, असें माझ्या मनास सदैव वाटत आलें आहे.

त्याचप्रमाणे प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित नि डॉ. वि. भि. कोलते यांनी माझ्या विनंतीला मान देऊन प्रस्तावना अन् पुरस्कार लिहून दिला. त्याबद्दल त्यांचें मी कोणत्या शब्दांत आभार मानावे, हेंच कळत नाही.

मुखपृष्ठावरील सुंदर चित्र, माझे चित्रकार मित्र श्री. मनोहर यांनी काढून दिले.

माझे स्नेही प्रा. भाऊ माण्डवकर यांनी सहाय्य केले. आणि आमच्या येथील अध्यापक ग. म. नारनवरे यांनी मीं सांगितल्या-वरून मुद्रणप्रत तयार करून दिली. या सर्वांचा नामोल्लेख करणे अगत्याचें आहे. कारण मी त्यांचे आभार मानलेले त्यांना खपायचें नाही.

गुरुदेव मुद्रणालयाचें व्यवस्थापक श्री. जी. डी. निकम आणि श्री. किसनलालजी मुंदडा यांनी अल्पावधींत पुस्तक छापून दिल्याबद्दल त्यांचेंहि आभार मानणे माझे कर्तव्यच नाही काय ?

वरूड,
पो. झाडगाव
जि. यवतमाळ

—वसंत गिरटकर

# अनुक्रम


| | |
|---|---|
| पायदळ | १ |
| मधुचंद्र | ३ |
| सरितेच्या संथजळीं– | ४ |
| निहारिते पथ... | ५ |
| व्यथा ! | ६ |
| गरिबीचा संसार | ७ |
| रागरागिण्यांची आता | ८ |
| लाजवन्ती | १० |
| हुरहूर | १२ |
| याद | १३ |
| दूर दूर अनंतांत | १४ |
| तुझ्या दाराहुनी जातां– | १५ |
| तुझ्या भाजी भाकरीस | १७ |
| काळी आठवण | १८ |
| चालगे ! चाल पेराया... | २० |
| प्रवास | २१ |
| पडे प्राजक्तिचा सडा | २२ |
| कर्कभिग ! | २३ |
| शरदांत ग्रीष्माची तप्तता !! | २४ |
| हिरवी निंबोणी | २५ |
| प्रभो ! तुझा साक्षात्कार ! | २६ |
| कधि कधि मी... | २८ |

| | |
|---|---|
| येंता शिणून भागून : | २९ |
| कितीकदा | ३१ |
| उडाल्या चिमण्या... | ३२ |
| सोनेरी सोबत ! | ३३ |
| नित माझ्या झोपडींत | ३४ |
| विफल आशा | ३५ |
| विशाल या क्षितिजाच्या... | ३६ |
| एकान्त हा पूरे ! | ३७ |
| केवळ तुझ्याचसाठी... | ३९ |
| अखेरी | ४० |
| तुझ्या रुपा गुणांवर | ४२ |
| तूं नाहीतर | ४३ |
| एक रात्र | ४५ |
| तुला विसरायासाठी | ४६ |
| नीरवतेचा तडा तडकला | ४७ |
| तुझी माझी झाली भेट | ४८ |
| पडली मिर्गाची शीतळ छायारे | ५० |
| तुझ्या माझ्या सोबतीला-- | ५१ |
| वेडी वाकडी वाट... | ५२ |
| ठिणगी | ५३ |
| शीळ ! | ५५ |
| निळाईचें वेड ! | ५६ |
| परायाची तूं परकी ! | ५७ |
| नाद नवा— | ५९ |
| रात्र काढली | ६० |

| | |
|---|---|
| स्वप्न | ६१ |
| उत्तरांतल्या उत्तर रात्रीं | ६२ |
| हौस | ६३ |
| धूंवाधार पावसांत | ६४ |
| नवतीची नार | ६५ |
| भिडुं दे जाळ नभाला... | ६६ |
| अशाच एका : | ६७ |
| टांचणी | ६९ |
| मरणास | ७० |
| भाव कणिका | ७१ |
| ओघ नदीचा संथ रुपेरी | ७२ |
| तूंच मायेचा माणूस | ७३ |
| तो गाव राहिला-- | ७४ |
| मुकामार ! | ७६ |
| अशीच होती रात्र काजळी | ७८ |
| मूकच तूं पण — | ७९ |
| एकदांच ! | ८२ |
| सृजन | ८४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नोंः दिः ........

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23092 वि: 3104
क्रमांक 9090 नों: दि: 6175

माझ्या सोनुल्या बाळाला
झाला बाओ पायवर
झालं चिमणं घाबरं

गल्ली भरल्या पायानं
घांस भरविले बाळा
तिन्ही सांजेच्या एदाळा

काऊ, चिऊचे मी घांस
भरवित होतें बाळा
झाल्या सटवाया गोळा

झाला बाओ पायदळ
पोट फुगलं बाळाचं
पारडं चढे मांत्रिकाचं

शेजारच्या गुरवाला
बोलवा ग जलदीनं
घ्यावी राखुंडी भारून !

अम्बाबाई ! रोडगा मी
यंदा वाहीन तुजला
दे ग आराम बाळाला

भंगराओी ! तुला दिलं
दही भाताचं मी बोणं
कर सोन्याची राखण !

मरिमाय ! नांवानं मी
तुह्या लावला अंगारा
किती केल्या येरझारा

कडू भोपळ्या ग वाणी
सुखी ठेव माझा तान्हा
तुझ्या आणिन दर्शना !

वरूड, दि. ४-४-४९

## मधुचंद्र

गुंफुनि सजणे, उभय करीं कर

मधुचंद्राला चल चंद्रावर !

मेघतंतुचा पिंजुनि कापुस
रवि-रश्मीकर गुंफुनि तांबुस
वसन गुलाबी विणतों लोभस
शेज तयाची बनविन मृदुतर !

नभः प्रांगणीं तारा सुमनें–
कटीं मेखला पदीं पैंजणें !
इंद्र–धनूची करीं कंकणें !
साडि स्वयंभू निळसर अंबर !

द्यू–पुष्पांचा नाजुक गजरा
आंबाड्यावर तुझ्या साजिरा
खुलें कृष्णधन तव कच भारा
लेअि गंधवति भूचें अत्तर !

दोन ध्रुवावर बांधिन दोला
द्राक्षसुतेचा प्राशुनि प्याला
–अग्निबाण बघ सुसज्ज केला !
चल होऊं सखि, स्वार तयावर !!

वरूड, दि. १०–१२–५४

# सरितेच्या संथ जळीं—

सरितेच्या संथ जळीं :
रूप न्याहाळीतो निम्ब
तशी भुलावण निळी !

ढग निसुरडा नभीं
फिरे एकटा मोकाट
गुरें पुळणींत उभी

चंद्रकोर चिंतितसे :
व्यथा अबोल उरींची
लावी कोण आर्त पिसे ?

निळ्या डोंगरांच्या हारीं–
दूर... निस्तेज, दृष्टीस
माळ उजाड निहारी !

जागो जाग हें खडक
लाही फुटली तापून
"पाणी, पाणी..." करी शोक !!

वरूड, दि. २९–१–५५

## निहारिते पथ....

संगमरवरी प्रासादाच्या
उंच उंच त्या सौधावरती
कुणी यामिनी–
अद्यावत जी शृंगारानें...
सज्ज सुशोभित !

राज पथावर दृष्टि रोखुनी...
निहारिते पथ !
— ट्रॅम धावती तारांतिल रस–
पीत पीत अन्
लोकल करितें तिकडे धुसफुस !

मधिच ओरडे कुल्पीवाला
आरोळीची ओसरतां शिग–
...वैशाखीची जाणवते धग !
—मुंग्यांची जणु लांबट रांगच !
त्या "क्यू" माजी तसेंच मानव !

घामट ... धामट
फिक्कट – पिंगट !

तिथेच खिळला नजर तियेची
लकाकले अन् निर्जिव लोचन
स्वैर पळाली अंगांगांतुनि
धांवत धांवत गोड शिरशिरी !
तारे मधल्या तप्त विजेपरि !!

वरूड, दि. ३०–९–५५

## व्यथा !

नको कळावया तुज :
माझ्या मनांतील व्यथा

लागशील झुरणीस—
ऐकतांच सखे, वृथा !

नको कळावया तुज :
माझ्या अंतरीचें गूज
तुझें माझें अलगूज
बंद होईल ग आज !

नको कळावया तुज :
माझ्या अंतरीची आग !
फणा काढतील उगा—
अंतरांत तुझ्या नाग !

नको कळावया तुज :
माझ्या मनाची घडण

कशी साहवेल तुला
उतरण अन् चढण !!

पहूर, (दाभा) दि. १०-१-५६

## गरिबीचा संसार

माझं घर साधंसुधं गवताचं ग खोपडं
नाही भिंती त्याला सये ! चारी बाजू आहे कुडं

आजनाच्या ह्या मयाली भिरडल्या बहू जून
नेम नाही कधी यांचा जाती मधून मोडून !

तण पुरे न म्हणून पोलका गे आंथरला
मिरगाच्या आधी सखे ! दिली अंधारी घराला

वळणीचे वासें बघ किती वाकले खालती
ठसठसा नेहमीच तुझ्या डोईला लागती !

समोर हें लहानसं चवकोनी ग अंगण
तिथं बसून रातरीं पाहूं पिठाळ चांदणं !

वैशाखांत तुझं माझं जथी झालं गे लगीन
दिलं होतं तथी यांस पांढुरकं सारवण !

—आतां तूंच माझी राणी सजव ना या घराला
आण लाज ह्याच्यापुढे प्रिये, नंदनवनाला !

तुझ्या हातीं नवलाई इंद्रपुरी गे वसव
माझी सारी ठाकुरकी एवढचांत तूं बसव !

घरधनिण माझी तूं नको पाहूं आराघुरा :
देई हातांमधी हात सुखे करुं या संसारा ! !

वरूड, दि. २७–९–४९

# रागरागिण्यांची आता

रागरागिण्यांची आता
संपलीसे मजलस
भैरवीच आळवीत
माझे बैसले मानस !

विरूनिया भावगीत
सुरू झाली विलापिका
हन्त ! गेलासे वसन्त
यावा कंठ कसा पिका ?

गेले दिन. . .गेल्या राती. . .
नको दुःखद आठव
प्यालो मिळुनिया गोड
फळाफुलांचें आसव !

जाईजुई बहरल्या
दिसे न्यारीच ती शोभा
आज मितीला अवघा
बाग डलंगला उभा !

जांभ, निम्ब, पोपयांनी
डवरला आखवा मळा
पंचक्रोशींत आगळा
बघा, त्याची हीनकळा !

संगमरवरी चिरे.....
कलावंताची घडण
नुरे राउळांत देव
सारे निर्जीव पाषाण ! !

वरूड, दि. ७–७–५३

## लाजवन्ती

लाजाळुच्या झाडापरी
प्रिया, माझी लाजवन्ती !
सालओची साल जशी
तिची सुकोमल कान्ती !

डाळींबाचें ओठ जणूं
दिसे भडक गुलाबी
गाली सांडीला रक्तीमा
कुणी चुम्बिला शराबी !

चालण्याची काय ऐट
पावलांचा धरी ठेका !
लावियला ताल बद्ध
शास्त्रशुद्ध कुणी एक्का !!

पहांटेस जात्यावरी
गाओ ओव्या गोडगोड
गवया रे ! गर्व तुझा
त्याच क्षणी सोड सोड !

न्हाली चवथ्या दिवशीं
केशसंभार मोकळा
समोरून गेलीस ग
गुंतवून त्यांत मला !

तुझे अवीट हांसणे
विकसते मुखावर
भाव मनीचें बोलती...
स्थिती माझी शब्दापार!

तुझ्या डोळयांतील झांक
मला मोह पाडणारी!
पाहिल्यांत आजवरी...
—माझी सखी, कांही न्यारी!

वरूड, दि. १-३-५२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23011 दि: 3/57
क्रमांक 9090 नों: दि: 6/6/57

## हुरहूर

मांजरझाल झाली, पोरं हीं गेली झोपी
पांखरं गेलीं खोपीं

गाव हो सानसून बांगडी झाली बंद
लागला कुठे छंद ?

घुबड घू घू करी वडाच्या झाडावर
तिचा कां गेला प्यार ?

अजून येईना कां ? गुंतली कुठं स्वारी
चाहुल नाही दारीं !

किती मी वाट पाहू डोळ्याला नाही डोळा
पोटांत उठे गोळा

सख्याच्या वाटेकडे डोळे हें एकतार
पाहते जशी घार !

ऐकाया येईना ती जोड्याची कारकीर
जीव हो खालवर !

येईना अजुनि कां ? मनाला हुरहूर
घोर रात्रीचा अंधार !

यवतमाळ, दि. ९-१२-४८

## याद

आठवे तुझ्या प्रीतीची  माधुरी  अवीट
आणि लोटतो हातांनी समोरचें ताट !

ऊन्ह तपे वैशाखीचें  रणरणें  दुपार...
स्वेद बिंदु भाळीं दमले  चालुनि शरीर
तिलोत्तमा, घाली पाणी स्नान थंडगार

देव कापसाच्या हातें  घासलीस पाठ !

नील नभीं पसरी सुषमा मंद सांजतारा
पुष्प गंधकोशा लुटुनी नेत रानवारा...
आणि पातलों तेथे मी थोडका उशीरा !

लोचनांत आणुनि पाणी पाहिलीस वाट !

चाचपुनी ओचा वदसी—"काय यांत बोला ?"
ओठ टेकितां मी गाली, म्हणालीस "चाला !"
घालि घांस माझ्या ओठीं. . .वाण ना सुखाला !

—याद आज केवळ उरली, नीज नये नीट !!

वरूड, दि. १३–१–५५

## दूर दूर अनंतांत

दूर दूर अनंतांत
पाहतों मी कुठेतरी
भव्य गगनां–माझारीं !

बघतांना शून्यांमाजी
माझी लागते समाधी
मग्न होतों तुझ्यांमधी !

उंच उंच तुटलेले
भव्य दिव्य गिरीवर !
पाहतों मी घडीभर...

—निळचा निळचा पहाडांत
होतो तुझा साक्षात्कार ! !
येते भरून अन्तर !

दृष्टी फेकतां सभोंती
दिसे अनंत पोकळी !
ह्याच कां रे–तूं राऊळी ?

त्र्यंबकेश्वर, दि. २४–४–५१

## तुझ्या दाराहुनी जातां–

तुझ्या दाराहुनी जातां :
नेत्र माझे रुळतात
माझे मना समाधान
पाय जागीं खिळतात

तुझ्या दाराहुनी जातां :
येतां बोल तुझा कानीं
एक निःश्वास सोडोनी
म्हणतों मी हाय मनीं !

तुझ्या दाराहुनी जातां :
रातराणीचा ये वास
दरवळे आसमंत
आणि फुलें मन्मानस

तुझ्या दाराहुनी जातां :
भरून ये माझा ऊर
आठवती आठवणी
उठे मनांत काहूर...

तुझ्या दाराहुनी जातां :
माझ्या पायाची चाहूल
ऐकूं नये कां ग तुला ?
पडली ग कशी भूल ?

तुझ्या दाराहुनी जातां :
हरपल्या श्रेयापरी
प्रिये ! तुज पाहतांना
चलबीचल हो उरीं

तुझ्या दाराहुनी जातां :
मन होय वेड्यावाणी
वैतागुनि जीव माझा
म्हणे "कुठे माझी राणी ?"

तुझ्या दाराहुनी जातां :
तुझ्याकडे मन ओढे
तुझी मूर्ति न दिसतां
पाऊल हें पडे पुढे ! !

यवतमाळ, दि. २-१२-४९

## तुझ्या भाजी भाकरीस

तुझ्या भाजी भाकरीस
येते अमृताची सर
जेउनिया पोटभर
देतो तृप्तीचा ढेकर

तुझ्या सडा सारवणें
येते अंगणास शोभा
—सखी ! कर्दळीचा गाभा
अिंद्रा घरचीं कीं रंभा !

तुझ्या रुस्व्या—फुगव्यांत
असे वेगळीच गोडी
होओी द्विगुणीत सये,
प्रेम आपुले तातडी

तुझ्या हातांचा विळखा
जणूं चंद्रम्याचें कर
ओविले कां कुणी प्रिये,
चांदण्यांचें मृदु सर !

तुझ्या एका चुम्बनांत
हातीं येई चतुःसिद्धी
आणि वावरे दारांत
निशिदिनीं ऋद्धिसिद्धी ! !

वरूड, दि. ८–२–५२

## काळी आठवण

पुन्हा काळी आठवण
नको व्हावया फिरून
कसेबसे कंठावे हें
हन्त, मृण्मय जीवन.....

"लांब बाह्यांचा ब्लाऊझ
तुझ्या सुगोल दण्डांत–
बसे रूतून गुलाबो
साडी जॉर्जेट्‌ची झोकांत

कानांतील कर्ण–फुलें
मणिबंधि रिस्टवॉच
दोन रिबिन्स्‌चें शेपटें
पाठीवर करी नाच..."

आठवते सारे कांही
ताजे जसेंच्या तसेंच...
आणि हृदयांत माझ्या
होई कसे, कसेसेच !

"तुझी मीच, मला तूंहि
घेतलेल्या आणा भाका
स्मरतसे अजुनीहि
साक्ष कार्तिकीची राका !

खळखळाट ओढ्याचा
कलकल हंस नाद...
नाद तुझ्या हांसण्याचा
कानीं घुमतो स्वच्छंद !

रुंद बदामी डोळ्यांची
कुणी युवती पाहतों
आणि हळूंच रुमाल
आड डोळ्याला लावतों!...

—तीच कार्तिक पूर्णिमा
दरसाल ये फिरून
पुन्हा काळी आठवण
करविते जागरण ! !

वरूड, दि. १८-१२-५५

## चाल गे ! चाल पेराया....

चाल गे चाल पेराया
जाईल वतर ना वाया
तो तुझा हात गुणबाई
पेरता कशी नवलाई
चवबोटीं धांडा येई !
लागेल नाग डोलाया !

ही झाली तिफण तयार
बांधले पिळण भरदार
कां लाविशि नाहक अुशिर ?
या पहा निघाल्या बाया...

लाविला बियाला हिंग
मिसळलें त्यामधें मुंग
तूं अपुल्या तालीं दंग
किति येळ भाकरी द्याया ?

उचल तो गुंड बीयाचा
मी घेतें हा बाजरिचा
बांध हा पालु चवळीचा
घें सरते वळि घालाया

वाणीचा घालूं पाटा
हुरड्यास काय मग तोटा
देईन नव्हाळी वाटा
कां लाविशि वेळ निघाया !

वरूड दि. १६-७-५०

ग्रं. क्र. १०५८

## प्रवास

चा ल ला से    कु ठे त री  
नाही गाव    आणि शीव  
दूर दूर...    जावयाचें...  
फक्त हाच    एक ठाव !

रात्र माजली    भ या ण  
दि से ना सा    झाला पथ  
काठी टेकीत    टे की त  
चालला हा    श्रान्त पांथ !

परी, ध्रुव–    ताऱ्या व री  
दृष्टि ठेवितो    अ ढ ळ !  
आणि क्रमितो    आ पु ला  
मार्ग रुक्ष,    डोंगराळ !

दऱ्या खोऱ्या,    दरकुटचा...  
येती पावलो–    पा व लीं  
कोण तया    जु मा नि तो  
ध्येयीं नजर    रोविली !

संपेल ही    काळरात !  
ब ह रे ल    चांदरात !!  
मग पोचेल    सु खां त  
पाय टाकितां    दारांत...!!!

यवतमाळ, दि. १५–२–५२

## पडे प्राजक्तिचा सडा :

पडे प्राजक्तिचा सडा
चिमुकल्या अंगणांत--
दरवळताती त्याचें
येथे निश्वास गंधीत

माझ्या मनींचा उल्हास
होई न कळत जागा
फुटताती ओठांतून
सार्थ कवितेच्या रांगा !

शरदाच्या चांदण्यांत :
निघे वसुधा न्हाऊन
माझ्या कवितेच्या ओळी
मस्त चांदणे पिऊन !!

वरूड, ऑक्टोबर ५५

# कर्कभिंग !

देवदयेनं वतर साधली, शेतकरी हरिखला
कसा रे ! करर्कभिग लागला !

निंदायाची येळ चालली, दिवस वागुं देइना
रोज झड उघाड ही देइना !

डवरायाचा चुकुनी गेला, फेर कसा चांगला
लव्हीचा ऊत फोफावला

झड पाण्याची कव्हां गडचा ! ही निघेल रे ! भैरवा !
काळजी रोज टोंचते जिवा !

कुटार, कडबा सरला सारा, जोहण केली सुरूं
कुठवरी मनांत ढिवसा धरूं ?

कोठ्यामंदी बैल रिकामे खांदी फुटला बुरा !
पिकाचा फुलेल कैसा तुरा ?

भिंगुरटचा ह्या वरीं घोळती, चिन्ह दिसेना बरे
काढुंया मिळुनी ती सात रे !

रघुनाथाचो होईल किरपा, करंल आपुले भले !
मग अतां चिंता करुं काह्यले ?

यवतमाळ, २७-७-५०

# शरदांत ग्रीष्माची तप्तता !!

तुझ्या संगतींत मला
होते वाटत दुःखांत सुख
मानापमान सगळे
होतो विसरत आपसूक !

माझ्या मनींची निराशा
तुझ्या स्पर्शांत विरघळावी !
जेवि लवण जलांत !
मज तशी अनुभूति यावी !

तुझा हळदीचा हात
आणी चेतना अचेतनांत :
तुझ्या ओष्ठीचे हास्य
पसरी सुषमा मन्मनांत

तुझ्या नाजूक स्पर्शांत
उन्हांत चांदण्यांची शीतता !
...पण भडकली आग
शरदांत ग्रिष्माची तप्तता !!

वरूड, २०-१-५५

# हिरवी निंबोणी

हिर्वी निंबोणी आलीसे पाडा
सखा सजण जल्दीनं धाडा !

झाली पाचूंची वनिं पेरणीं !
चैत्र घोळतो मनिं लावणी...
बाअि, सुकलासे हा पानपुडा

आली कोकिळा पंचम गात
वाहे पसंत वसंत-वात
शालु हिर्वा, हिर्वा हातिं चुडा !

शुभ्र जुईची अुमले कळी
तिज पाहत बसते खुळी
माझ्या हृदया जातसे तडा

अंबराचं तूं दुर्मिळ फूल
दूर गेलास देअुनि हूल !
तूंच जीविचा जिवलग हुडा !

वाऱ्यावरि हें गंधित श्वास–
रोज काढुनि ठेविते घांस
पाणावती ह्या डोळ्यांच्या कडा

तुझ्यासाठीच भरला घडा
ओला अजुनि मोकळा जुडा
हातिं तसाच केशरि विडा
वाटे सुना सुना मज वाडा !

वरुड, दि. ५-८-५४

## प्रभो ! तुझा साक्षात्कार !

निळें निळें हें डोंगर
बघतों मी वारंवार
त्या त्या क्षणीं खरोखर
प्रभो! तुझा साक्षात्कार!

सध्या प्रकाशीं धूसर
दिसे सृष्टी चेतोहर !
मनीं भावना मधुर...
तेथें तुझा आविष्कार

भंवतीचा अंधःकार
हांकलीत दूरवर
येतां उषा ! प्राचीवर
होतों तुझा साक्षात्कार !

हेलावतो रत्नाकर
त्याची प्रत्येक लहर
गाते संगीत सुंदर
तींत तुझा साक्षात्कार !

वसंताची अेरझार !
होओ जेव्हां धरेवर
लेते मही अलंकार
घडे मज साक्षात्कार !

होतां वर्षा क्षितीवर
आनंदार लोटे पूर...
हृदयांत महामूर
तई तुझा साक्षात्कार !

माझे शोधितों अंतर
मूर्ति तुझी तेथे तर !
निर्गुण नि निराकार
आज खरा साक्षात्कार !!

अकोला-यवतमाळ रेल्वे दि. २९-४-५१

## कधि कधि मी .......

कधि कधि मी......

बसतों तुझाच आठव करीत
पिंपळाच्या पडक्या पारावर !

कधि कधि मी......
ढगाळल्या आकाशांत रोवून लोचन
बसतो एकटाच आसवें गाळीत
सड्याच्या अंगणांत !

कधि कधि मी......
लावून नजर
डोंगरा आड बघतों
माझ्या सखीची चढती प्रीत !

कधि कधि मी......
काढून ठेवितों ताटांमधला
तिच्या नांवाचा मुद्दाम एक घांस !

–अशीच आहे माझ्या
व्याकुळल्या प्रितीची
पिसाट रीत !!

वरूड, दि. ४–२–५४

## येता शिणून भागून :

येतां शिणून भागून :
डोळे पाहतों भरून
तान्हं गोंडस चिमणं : घेतो तया उचलून !

घेता त्याचा मुका एक
विसरतो तहान भूक
काय वानूं तें मी सुख : तुच्छ स्वर्गीची ती सुखं !

× × ×

येतां शिणून भागून :
डोळे पाहतां भरून
साधी भोळी ती धनीण : उभी दाराला धरून !

गोड हासतां गालांत
करीतसे मीहि स्मित
आणि घेतो तिचा हात
हळुवार मी हातांत !!

येतां शिणून भागून : गोड वाढते जेवण
ताजी भाकर करून
खातो ढेकर देऊन !

रंग महालीं पलंग : टाकलेला असे तंग !
देते चुरून ती अंग
घालविते शिणभाग !

येतां शिणून भागून : डोळे पाहतां भरून
भोळी भाबडी धनीन
आनंदते माझं मन !

देवाजीला त्या प्रार्थुन : अन् मी मागतो मागणं :
"सुखी ठेव सोबतीण
नको इंद्राची कामिन !!"

यवतमाळ, दि. ३१-८-५०

## कितीकदा

कितीकदा तूं आलिस जवळी
सिंचित, उधळित कुसुमित गंधा...
तुझाच झाला तेव्हां पासुन
हा कायमचा गुलाम बंदा !

कितीकदा तूं–तुझे अनारी...
अधर जुळविले अधरावरती
आणि आपुल्या हृदयाला ये
जणुं पुनवेची सागर–भरती !

कितीकदा तव चंद्रकरांचा
विळखा पडला मानेभंवती
त्या विळख्यांतच–त्याच समाधित
कितीक झाल्या सुखकर रातीं !

आठवते तें लाडिक भाषण–
अन् म्हटलेली मोहक गाणीं:
"चकाकणाऱ्या या दुनियेंमधि–
तूं राजा अन् मी तव राणी !!"

––गत दिवसांची शिळी शिदोरी
घेउनि सोबत–जगतो जीवन !
जीवन कसले ? भासच केवळ !
चुलींत जळले आशेचें कण !!

वरूड, ३०–६–५४

## उडाल्या चिमण्या....

निळा पडदा वाऱ्याने
झेंप घेतो ग जा व र--
लोखंडाच्या, आणि सरे......
मागेपुढे-होतो स्थिर !-

--दोन जिवांचें बोलणें
चाले डोळयांच्या भाषेंत
भोंती हळूंच पाहाणे......
खाली नेत्र निमिषांत !

क्षण हंसू ओठावरी--
ग्रासी तशीच निराशा
चाले छाया-प्रकाशाचा
खेळ म्हणा वा तमाशा !

--कुठे लागली चाहूल
भुर्र उडाल्या चिमण्या
दोन प्रतिमा कुठेशा
क्षणांभीतरीं लोपल्या ! !

वरूड, दि. २६-१०-५५

## सोनेरी सोबत !

निळ्या मेघ–मालेमाजी

विहरावे दिनरात

संपू नये कल्पवरी

तुझी सोनेरी सोबत !!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23८११ वि: काव्य
क्रमांक १४१० नों: दि: ८।८।७५

## नित माझ्या झोपडींत....

नित माझ्या झोपडींत
आनंदच सांठविला
उञ्च महाल माडयांत
नसे थोडका यांतला !

नित माझ्या झोपडींत
खेळे वात्सल्य बाळांचें
त्यांच्यापुढे फिके होती
पाश कर्दन काळाचें !

नित माझ्या झोपडींत
दिव्य नांदते संगीत
तेहि सप्तक सूरांत
नि मी मग्न होतों त्यांत

नित माझ्या झोपडींत
तिच्या प्रेमाचा उबारा
वाकळीनें धरे हिंव !
मज सुखद निवारा

नित माझ्या झोपडींत
गाते एकली कोकिळा
असो हिवाळा उन्हाळा
गळा नेहमी मोकळा !

यवतमाळ, दि. २-८-५०

## विफल आशा—

वाळुनिया झाले कोळ
जीवन हें माळरान
मानेवरी टाकी मान
शुष्क जाहलेले तृण !

वठल्या ह्या वृक्षलता
तयांना ना पानं फुलं !
केव्हां तरी संपणार
बाई ! आतां संधिकाल !!

"येऊनिया वर्षा कधी
न्हाणविल ही मेदिनी !"
अणूरेणू सांगतो ना
तुज तरी आक्रंदुनी ?

ग्रीष्माचा हा ताप जरी
झाला खचित दुःसह
येऊनिया पावसाची
सर शमविल दाह !

होती जरी आस मनीं
माझ्या दृढ निशींदिनीं !
परि झाली विफल ती
आणि राहिलीसे मनीं !!

वरूड, १३-११-५१

## विशाल या क्षितिजाच्या........

विशाल या क्षितिजाच्या पुढती
करांत कर चल गुंफुनि जाऊं
तृणावृता भू नव नीलांबर
सदा मोकळे अंगण पाहूं !

नको घराच्या चार भिंतिचें
जाचक बंधन मला तुला हें
मंद समीरण, निर्झर–गायन
खुल्या मोकळ्या हवेंत राहूं...

ह्या बाजारी जगापासुनी
किती योजनें दूर असावे
असें वाटते मनास माझ्या
दुःखांचें शत डोंगर साहूं !

विशाल या क्षितिजाच्या पुढती
करांत कर चल गुंफुनि जाऊं !

पहूर, ( दाभा ) दि. ३०–५–५६

# एकान्त हा पूरे !

सखें, तुझ्या आलिंगनीं
राहणे न सुखावह
बघुनिया सभोंवती
होतो मदंगाचा दाह

पसरले वाळवंट
रखरखीत सभोंती
ताप ग्रीष्माचा असह्य
पाय नाजुक पोळती

टाक चौफेर नजर
झाडझडुला ना दिसे
मृग जळाचा सागर
लावी जीवा आर्त पिसे

झुळझुळ वाहणारा
प्रेमगितें तो गाणारा
वाट सरा जो निवारा
कुठला गे मधु झरा

सखे, तुझ्या आलिंगनीं
राहणे न सुखावह
सभोंवती बघुनिया
होतों मदंगाचा दाह

अंवसेचा अंध:कार
भोंती चोर पावलानं
दशदिशांत दाटला
वाटे भयाण, भीषण

किर्‌किरती रातकिडें
वाढविती भेसुरता
भासे पसरली ही का ?
विश्वीं स्मशान शांतता

पुरुषाचा नच वारा
नच पांखराचा खोज
जणू प्रलयकालीन
आली जगा चिर नीज

सखे, तुझ्या आलिंगनीं
राहणे न सुखावह
सभोंवती बघुनिया
होतों मदंगाचा दाह

झाले अवघे जीवन
शून्य, नच राम ऊरे
काढ मिठी गळ्यांतील
झाला एकान्त हा पुरे !

वरूड, दि. ७-८-५१

# केवळ तुझ्याच साठी...

केवळ तुझ्याच साठी लोचनांत आसूं आहे.
केवळ तुझ्याच साठी ओठावर हांसू आहे !

वेडी आशा अजूनहि एकलकोंडी गात आहे...
मिणमिणत्या पणतीची किंचित्शी वात आहे !

ढगाळलें आकाश हें... भयानक रात आहे.
कुठे ? कुठे ? कुणिकडे...? पावलें ही नेत आहेत...

गारठलेल्या गारठ्यांत विवस्त्र काय आहे.
काटे कुटे पेरलेले... अनवाणी पाय आहेत...

साग, मोह, देवदार... रान घनदाट आहे.
नागमोडी वळणांची ही पाऊल वाट आहे !

–बरा अिथे असाच मी, तुझी स्मृति साथ आहे.
त्या तिथेच पलिकडे– उगारून लाथ आहे !

तुझ्याच मीलनास्तव तुझ्या घरीं येत आहे...
...दारीं उभा राहून तूं हात पल्लवीत आहे !!

–केवळ तुझ्याच साठी "जान कुर्बान" आहे !
केवळ तुझ्याच साठी डोळ्यामधि प्राण आहे !!

वरूड दि. १२-१०-५४

# अखेरी

"चालायचं काय गडे,
आज सिनेमा बघाया ?—
छान लागलं "पिक्चर"
संधि दवडा कां वाया ?"

मधाळशा आवाजांत—
"खरं सांगाना, डियर—
जायचं ना ?" ओठीं हसू
एक हात खांद्यावर !

"असे अबोल कशाने :
नच दिवसांत दोन
पाहियेला एकहि "शो"
दोघं मिळून मिळून !"

"कां ग ममी, पपा तुम्ही
दोघे जण का जाणार...
आणि मला का एकटी
तुम्ही घरीं ठेवणार ?-"

"अग आपण सारेंच
जाऊं पहिल्याच "शो"ला...
नको सेकंड–बिकंड
ऐन झोपेच्या वेळेला"

"अग, पण काय असं
तुम्ही लावियलं मागे--
आज महिना अखेरी !
आहां झोपेंत वा जागे ?

यवतमाळ, दि. १३-१२-५५

# तुझ्या रूपा गुणांवर

तुझ्या रुपा गुणांवर :
माझे लोभावलें मन
तुझें चाललें चिंतन
आणि व्हावें मीं उन्मन !

तुझें प्रेमळ, लोभस
अंतर्बाह्य अंतरंग
माझ्या साठीच सदैव
चाप ओढितों अनंग !

तुझें अपरूप रूप
रतिलाहि लाजविल
आणि सत्ता माझ्यावरी
रातंदिन गाजविल !!

पहूर, (दाभा) ११-१-५६

## तूं नाही तर

तूं नाही तर...
सांग कशाला मीच जगावे
घाम गाळुनी उरीं फुटावे

तूं नाही तर...
कोणासाठी व्यर्थ झटापट
आणि कासया बाष्कळ वटवट

तूं नाही तर...
शरदांमधले ललित चांदणें
दुःसह मजला
वैशाखींचें ऊन्ह रणरणें!

तूं नाही तर...
गीत गोठले सुकल्या ओष्ठीं
अन् कुठल्या लोभस गुजगोष्टी
निशीदिनीं मी सदाच कष्टी...

तूं नाही तर...
कशी श्रमांती मज विश्रांती
येतां वापस श्रान्त दिनांती

## एक रात्र

आला तैसा निघुनी गेला एकच राहुनि रात
कथावया ना मिळालि फुरसत मनांत मनींची बात...
कृष्णसघन विस्तार निशेचा—भंवती काजळ रात
वरचेवर ही कितीक वेळा सारु दिव्याची वात

दारावरची थाप ऐकुनी काढियले जरि दार
हाय ! तिथे परि नव्हता माझ्या जिविचा जिवलग प्यार !
सराईत ती फिरतां बोटें कुरळ्या अलकांमधुनी
अुठुनी बघतां दृष्टि देखिला माझा शारंगपाणी !

दिली, घेतली ओष्ठ द्वयांची मादकशी वारूणी
आणि तोंच वर येअि चोंबडी शुक्राची चांदणी
..."येतो" इतुके बोलुनि गेला...हीच दिशा ही वाट—
एक उसासा सोडुनि टिपले, मग नेत्रांचें कांठ !!

वरूड, दि. २-१-५५

तूं नाही तर...
गाळणार मग कोण आसवें?
अन् टाकिल मजवर मुठभर माती
उडून गेल्यावरी पारवे!

तूं नाही तर...
चांदण्यांतहि रमे न मन्मन
वाट पाहतों
कधी मृत्युचें रजत निमंत्रण!!

वरूड, २९-१-५५

# एक रात्र

आला तैसा निघुनी गेला एकच राहुनि रात
कथावया ना मिळालि फुरसत मनांत मनिची बात...
कृष्णसघन विस्तार निशेचा—भंवती काजळ रात
वरचेवर ही कितीक वेळा सारु दिव्याची वात

दारावरची थाप ऐकुनी काढियले जरि दार
हाय ! तिथे परि नव्हता माझ्या जिविचा जिव्हलग प्यार !
सराईत तो फिरतां बोटें कुरळचा अलकांमधुनी
अुठुनी बघतां दृष्टि देखिला माझा शारंगपाणी !

दिली, घेतली ओष्ठ द्वयांची मादकशी वारूणी
आणि तोंच वर येअि चोंबडी शुक्राची चांदणी
..."येतो" इतुके बोलुनि गेला...हीच दिशा ही वाट—
एक उसासा सोडुनि टिपले, मग नेत्रांचें कांठ !!

वरूड, दि. २-१-५५

## तुला विसरायासाठी

तुला विसरायासाठी
किती केल्या यातायाती
अपयश आले हातीं !

तुला विसरायासाठी
झालों कैफांत मीं धुंद
आवळती स्मृति-बंध !

तुला विसरायासाठी
नाना पाहिले तमाशें
व्यर्थ ! मना तुझे पिसें !

तुला विसरायासाठी
केलें दूर देशाटन
--पण तुजपाशी मन !

गेलो तुज विसराया
आणि घट्ट झाली माया !
जिणे तुजविण वाया !!

वरूड, ४-१-५५

## नीरवतेचा तडा तडकला

नीरवतेचा तडा तडकला
मनास पडली शत खिंडारें
मरण येइना म्हणुनी जगणे
गारठ्यास हि भरे कांपरे !

साद घातली मृद्गंधानें :
अचपळ रानांतिल वाऱ्याला
तमा कुणाला त्या गंधाची
पारखी जों तों नकली नाणें !

नीरवतेचा तडा तडकला
काक ओरडे कर्कश रवें :
चोंच खुपसण्या छिद्र पाहतो
पळापळाला पुन्हा नवनवें !

कुरणां मधल्या मांसल गाई
गिधाड गगनीं घेत भरारी
हिरव्या गवता शाप देउनी
म्हणे– 'मरे हा कधी मुरारी"!

वरूड, २६–६–५६

# तुझी माझी झाली भेट

तुझी माझी झाली भेट
जोंधळयाच्या वावरांत
हृदयाची धाकधुक
वाढली तीं निमिषांत
नि वायूच्या झुळुकेंत
सळसळला जुंदळा
पाझरली भावगंगा :
फुले मन्मनीचा मळा !

तुझी माझी झाली भेट
धुण्याच्या ना घाटावर ?
निसटले हातांतील
न कळत कां धोतर ?
खटयाळ तो मेला वारा
आला चोर पावलानं
डोईवरचा पदर
खाली पाडला द्वाडानं !

तुझी माझी झाली भेट
मार्गेंसरीच्या थंडींत
भारा तुझ्या डोईवरी
जाधवीच्या पांदणींत !

झाली नजरा नजर
हंसू फुटे ओठावरी
बोलायाची परी सये,
नव्हतीच उजागरी !

तुझी माझी झाली भेट
पायऱ्याच्या विहिरींत
आणि अवचित कशा
उठे लहरी पाण्यांत
बघताच संकोचानं
ओळखिली तुझी खूण !
नच करितां विलम्ब
दिला गुंड उचलून !

तुझी माझी झाली भेट
सायंकाळीं माळचावरी :
कसा...कुणी पाहिल ना......
आढेवेढें...बंध दुरी !
--घडूं नये तें घडले......
मोल दिले तिने त्यांस !
परी नव्हते शिवारीं
चिट् पांखरूं बघण्यास !!

अकोला ते यवतमाळ, दि. २९-४-५१

## पडली मिर्गाची शितळ छायारे

पडली मिर्गाची शीतळ छायारे
नाही आलास तूं माझ्या राया--

नवनवीन ही पांखरें
वाहूं लागले पश्चिम वारें
गाऊं लागल्या ह्या आंबराया-रे

"पेर्ते व्हा"ची झाली ललकार
शेतकरी सुरूं करी पेर
माझा आठव कां गेला वाया-रे

अजूनही येशील ही आस
माझ्या लागली वेड्या जिवास
कशि केलीस पातळ माया-रे

वरुड, दि. ३०-७-५६

# तुझ्या माझ्या सोबतीला—

१०५८

तुझ्या माझ्या सोबतीला
होता पहाटेचा तारा
कुणि टिपतो आकाशीं
सांडलेला शुभ्र-पारा

वारू वादळ वाऱ्याचा
घेऊनिया क्षणभर
नाही कळले उभया
किती कांपलें अन्तर !

निळ्या झुलत्या ढगांत
केले सुदूर भ्रमण...
आम्हा ओढूं पाहातसे
चंद्रगुरुत्वाकर्षण !!

सीमा दहाहि दिशांच्या
आलों आम्ही ओलांडुनी
कैफ नुतरे अजुनी
अशी आगळी वारुणी !

केली आकाश गंगेची
आचमनें तीन रुंद
आणि आत्म्यांत दाटला
माझ्या विशाल सुगंध !

वरूड, दि. ८-९-५६

## वेडी वाकडी वाट....

वेडि वाकडी वाट धांवतें...
ल खमा ई च्या माळावरती
मिल्‌मिल्‌च्या लवणाला वळसा–
उगा दचकते हिरवळ गर्ती

साद घालतो बुज्रा शिक्रा
तिर्कस घेउनि झेंप नवाडी
हळूंच करतो खुणा कुणाला?
जरा कुणाशी तशी लबाडी...

खं रा टी च्या खो शां म ध्यें
कुणा भुलवतो नवखा चकवा
वाटेवरल्या वाट सराला
हांक मारतो...दिसतो फसवा...

सालइची नव लोभस कांती
भुरळ पाडितें महारुखाला !
हात धराया तिचा धजतसे
जी शोभावी दुहिता त्याला !!

--आणि अनोखी पांथ हांसती
जातां येतां, दांत विचकुनी !

वरूड, दि. २५-९-५६

# ठिणगी

हा ग्रीष्म डागळित आला त्रिभुवन सारे
व्याकूळ पृथ्वि अन् व्याकुळ स्थिरचर सारें...
वाढले, वाढलें रान भयंकर जीर्ण
ह्या वृक्षलतांना एक न उरले पर्ण !
तुडविली पायदळी तमाम पंच–क्रोशी
लवविल्यांत माना उञ्च, ताठ अवकाशीं
कितितरी देखिले वसंत, आणिक वर्षा...
नच जुमानिले या लागुनि खेद न् हर्षा
मनिं अहोरात्र परि एकच यांच्या अर्षा
गगनाचा घ्याया वेध–करूं त्या स्पर्शा !

वाढली वयाने ही शतकानुशतकें :
नयनांतिल रक्ती विखार तप्त न फांके !
जरि झुंजुनि झुंजुनि खंगुनि झाला साटा
पण कायम काटा–यौवनांतला ताठा ! !
शोभाव्या दुहिता, स्नुषा शोडशा वेली
हे निसूर यांनी त्यांशी केली केलि !
तें नाग विखारी अति जालीम सहस्र !
करि घोर काननीं वास श्वापदें हिंस्र !
आरोळी देतां भरे कांपरे अंगा...
साम्राज्य तयांचें नाच नाचती नंगा !

पण–" हन्त ! घराचें फिरले आढे, वासें...
ये दुर्दिन...पडले, दैवें अुलटे फासें !"
दिन किती लोटले ? नाही वळले मेघ !
नच नयना दिसली–ज्वलंत बिजली–रेघ
जाहली वाळुनी कोळ, राहिली हाडें
नुरलाच रक्तिमा–भुतेंच ही नच झाडें
तृण गेले मिळुनी मातीला हो माती
द्रावणांत जेवी पदार्थ तें विरघळती

—अन् एके दिवशीं नकळत पडली ठिणगी
या उन्मत्तांची अुठली भरली जिनगी !

वरूड, दि. ७–१–५५

# शीळ !

अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि ...

अुभी एकटी अंगणीं अंगणीं
निद्रा नयेच लोचनीं लोचनीं
शीळ घुमते श्रवणीं श्रवणीं !
गस्त गेलीसे येअूनी येअूनी
नील शुक्राची चान्दणी चांदणी !
दिसे पूर्वेला गगनीं गगनीं
सामसूम ही धरणी धरणी
शांति तशी च, मन्मनीं मन्मनीं
एक जीवाला ओढणी ओढणी !
मन लागले झुरणी झुरणी !
...ऐकूं येतसे चाहूल चाहूल
वाजे कुणाचें पाअूल पाअूल
सूर्य आकाशीं डोलेल डोलेल
आभा सर्वत्र फाकेल फाकेल
...छीःथूः होईल जनांत जनांत
चिन्ता घोळते मनांत मनांत
भेटूं आंब्याच्या बनांत बनांत
वेळ पाहून निवांत निवांत
गळा घालून गळचांत गळचांत
गोष्टी करूं या प्रेमांत प्रेमांत
चल रे सजणा ! जाअूं दे ! जाअूं दे !
प्रीति अभंग राहूं दे ! राहूं दे !

वरूड, दि. २४-७-५२

## निळाईचें वेड !

उडू पाहतसे माझें
इथे बांधलेलें मन
घेते गरूड भरारी
तोडूं धजतें बंधन !

त्यांस निळाईचें वेड
झेंप घेते पलिकडे
उञ्च, दुर्गम, विशाल
लंघुनिया जाय कडे !

चार भिंतीच्या उंचींत
त्यांस नच समाधान
मन झेंपावतें माझें
पडे अपुरे गगन !!

घरकुलांत तयाचें
जरी स्थिरावलें पाय :
परी चंद्रलोकीं शोधी :
त्याचें हरपले प्रेय !

उडण्याचें असे वेड
मना, लागलें अक्षय...
आणि धरेचा आधार
सोडी आज पद-द्वय !!

वरूड, दि. ३०-७-५६

## परायाची तूं परकी !

परायाची तूं परकी
कसे म्हणूं तुज माझी
केव्हां तरी या गोष्टीला
सये! होशिल कां राजी?

परायाची तूं परकी
कसे म्हणूं तुज प्रिया
नसे जनाची तरीहि
मनाची का नको याया ?

परायाची तूं परकी
शंका उद्भवतें मनीं
"धरूं तुझा कसा संग--
होईल ना छी:थू जनीं !"

परायाची तूं परकी
नको वदूं मला "भाऊ"
वजवजनं आपुलं
भलतंच नातं लावूं !!

परायाची तूं परकी
देशी विडा कां हातांत
नको लावूं माझ्यासवे
बापूजीचं हळूं नातं !

परायाची तूं परकी
पूरे झाले तुझे छंद
" परत्तार जहराची ! "
नको तुझा आतां फन्द ! !

यवतमाळ, दि. २-८-५०

## नाद नवा—

अनोळखी हा मुलुख नवा !
बघता लावी वेड जिवा :

तुझ्यामुळें हें अनुपम वैभव
निवले लोचन बघुनी नवनव...
अवेळीच ये "कुहूऽऽ" रवा !

इथे सुखाची सीमा सरली
शब्दाविण मज कविता स्फुरली !
—मानवली मोकळी हवा !

मधुर स्वरांची स्वप्न-रागिणी
भारुनि उरली वातावरणीं
एक एक तूं जोड दुवा !

तृणावृता भू वर नीलांबर
तूं आणिक मी हिंदोळ्यावर...
जगा वेगळा नाद नवा !

पांढरकवडा, दि. १-७-५५

# रात्र काढली

रात्र काढली
पुसाच्या थंडींत
दोघांनी मिळून!...
चावरे वारें
होते तें वाहात—
पिसाट खट्याळ !
तिखाडीच्या गवताचा
मादक दर्प
मिसळून त्यांत!
ओलसर ओलावा
हुंगीत हुंगीत
जागलों रात!
लगतच्या ओढ्यांतील
गारठलेला गारठा
टोंचतो अंगास : चिमणे दांत !
--फाटकी झोंपडी
दाराविना एकटी...
अधांत मधांत : आकाशाच्याखाली
कुठुनसे आलो...
तिच्या आश्रयाला !!
बुडत्याला आधार !

फाळेगाव, स्टँड दि. २३-११-५५

## स्वप्न

दोन ध्रुवांचें अन्तर तोडून
आलो आपण दोघे येथे
गाऊं लागलो :
प्रीतीची मधु, मदीर गीतें—
परस्परांची झाली ओळख
क्षण संभाषण...
आणि वाटले हेंचि चिरसुख !
—स्वप्नचि ठरलें परंतु केवळ !

वरूड, दि. १-१०-५६

# उत्तरांतल्या उत्तर रात्रीं

उत्तरांतल्या उत्तर रात्रीं
उभी गवाक्षीं आगाशीवर
गगन सागरीं चंद्र विहरतो--
सवे रोहिणी, घेउनि नवथर...

वाऱ्यासंगे वाहत होता
लवणामधला गंध ओलसर,
अनाम कोण्या वनस्पतींचा--
विरघळलेला नूतन फुलवर!...

कुंडलिनीचे शोधित गेला
मूळ खोलवर-थेट तळाला
मला न कळता चढली धुंदी
आणि लागलें मी गायाला...

कर्णीं अवयव चराचरांच्या
"म्हणा, म्हणा"चा भवती पिच्छा
फुटति जिभा अन् अचेतनाला
थाप पाठिवर-"बहोत अच्छा !

वरूड, दि. २-१०-५६

# हौस

रे सोड मला जाउं दे घरीं
का अजुनि न झाली हौस पुरी !

झोपी सारें गेले बघुनी
हात अुशाचा हळुच काढुनी
राजासाठी आली राणी
ही रम्य पुनेची रात भुरी

जरी आजचा निवांत सुन्दर
फुलली कमळें आकाशीं वर
म्हणति तारका ज्या नारीनर !
कर खुले हृदय चल त्वरा करी

शतालिंगनें कितीक देशिल
दीर्घ चुंबनें कितीक घेशिल
मधु अधरांचा कितीक पीशिल
या झन्यास खण्ड न कल्पवरी !

कळते यांतिल मला माधुरी
सहवासाची तुझ्या हांवरी
--पण ब्रम्ह्याचा लेख अक्षरीं!
मी पुढच्या जन्मीं तुला वरी !!

वरूड, दि. ९-१२-५४

## धूंवाधार पावसांत

धूंवाधार पावसांत :
जाशी कशाला बाहेर
काळा गुडुप अंधार !

धूंवाधार पावसांत :
भिजु नको अकारण
फणफणेल चिमणं !

धूंवाधार पावसांत :
भिजतात वृक्षवेलीं
माझी मालन नवेली !

धूंवाधार पावसांत :
नदी-नालें डहुळले
मन पल्याड गुंतले !...

धूंवाधार पावसांत :
कोटरांत राघू मैना--
मानेवरी टाकी माना !!

वरूड, दि. १४-७-५६

## नवतीची नार

पिऊनि घे पाणी सोकलेली ही धरणी
ग्रीष्म तापउनी हीला गेलासे निघुनी

हायरे! दुर्दशा झाली कैसी परमेशा
आटल्या सरिता नाही कुठे पाणी पसा

—आला पावसाळा हिचो बदलली कळा
पायांमधी वाळा गळा खुलला मोकळा

ओठावरी गीत लज्जा हिचिये मनांत
हिरवी अंगात चोळी, चुडाहि करांत

आज साजल्याली बघ नवतीची झाली
भुलवाया मन नार कुणाचें निघाली

वरूड, दि. २२-७-५२

## भिडुं दे जाळ नभाला.......

ही जांभुळलेली डोईवर घनमाला
या असीम गगनीं विहरत अन् गिरि-शैला
बरसती शरांसम आवेगें जल धारा
झापीत चालला भयकर वादळ वारा !
देईल जगाला अुघड्या कोण निवारा
कुडकुडत उभी ही ! –समोर डहुळे नाला
"हें चढते पाणी, कधि जाओीन घराला?"
तें चिमणें डोळें शोधित असतिल कांही
––मन मनांत बोलत, "अेअिल केव्हां आई?"
तव मानस अवघे खिन्न, तुला जरि घाई
जल डोंगरिचें बघ, फेंस, कचाटा, पाला...
ना पावत आतां अंबाई नवसाला !
पाळण्यांत डोळें चिमण्यापाशी खिळले !
आंतल्या आंत मन मातेचें कालवले
नभि विजा लकाकति वा तेजाचें भालें
हो मेघ गर्जना, कापितसे हृदयाला
मुसळधार वर्षत जल, ती पैल तिराला !
...त्या अुंच हवेलित नसे पावसा थारा
झोपलीत सारी घट्ट लाअुनी दारा
ही अुघड्यावरते भिजते कुणि नव दारा
...हें ग्रीष्मर्तो, ये, घेअुनि दाहक ज्वाला
रे जाळ, भाज अन् भिडुं दे जाळ नभाला !

वरूड, दि. १३-७-५६

## अशाच एका :

अशाच एका :            नीरवतेच्या वेळीं
तिसरे प्रहरीं......
कोण दिवस तो          नुरे आठवण
पण......
"कुण्डल घ्या होऽऽ कुण्डल..."
वाऱ्यावरती विरली नाही
त्याची ही ललकारी
तोंच......

तोंच माझिया नेत्रापुढती :
"चिमणे इवले इवले
हात हालवित...पाय हालवित...
बुबुळांचीं जांभळें नाचवित--
मेघ तंतुच्या कोमल हस्तें
मला बाहवित—
हसुनी माझ्याकडे झेपवत--
तसेंच माझ्या गाला सन्निध
गाल चिमुकला—
गुच्छ गुलाबी--
घुसळित घुसळित..."

...आणि ऐकून दारावरची टिक् टिक्
दार उघडिले जरि–पदराने
डोळे पुशीतच!
“काय रडाया झालें तुजशी ?”
ऐकुनि प्रश्न तिकडचा
उत्तर द्यावे काय कळेना ?
पुन्हा अडविलें
बांध घातला
कसा बसा मी
माझ्या विकल मनाला !!

वरुड, दि. ८–९–५६

## टांचणी

कुठुनी शिरली
कुणा कळेना
हृदयांमाजी एक टांचणी
उगा लाविली अहर्नीश ही
उठल्या बसल्या
जिवा जाचणी !

खुपते पण ही–
मुळी दिसेना
चित्र काढिले "एक्सरे" घेउन...
प्रतिमा नच ये, दिसे "क्लिअर" ते
कितीक थकले–
"सिव्हील सर्जन"! !

वरूड, दि, २७–६–५६

## मरणास

ये ये ये ये, ये तूं मरणा !
घालुनि निज सुन्दर आभरणा

चैन नसे तिळ माझ्या जीवा
तुज वाचुनिया पळ न विसावा
अकाल हा जरि, तरि ये रमणा !

सरे न इथले दाणापाणी
...पण दुनिया ही चीज किराणी !
खचित मला तूं सुखकर राणा !

झालें नेत्रीं गोळा अवयव
चाहुल घेतें मन माझे तव
जग झिडकारो, मीं नच सरणा !

द्वार तुझ्यास्तव मुक्त सदोदित
अन् काया ही माझी पुलकित...
जीव उताविळ तुझ्या मीलना !!

वरूड, दि. १३–३–५६

## भाव कणिका

ह्या चार दिसांतच झाली ओळख अपुली
अन् परस्परांच्या हृदया भरती आली
वच बोलुनि चुकलो, अभय मनांतिल भाव
पण, आज जायचें सोडुनि तव सहवासा !
वद, कसा जगावा, जिवनाविण हा मासा ?

* * *

"जा विसर मला मी जाते नांदायाला
कां अश्रु लोचनीं, पदर लाविला डोळा !"
...विसरणे तुला का खरेच वाटे स्वस्त ?
गे ! प्रेम कधीही विसरत नाही प्रेमा !
नित मात्र वाढतो तद्विषयाचा प्रेमा ! !

* * *

कण अंधाराचें खिरे प्रकाशांमाजीं
ही रजनी नाही मुक्त व्हावया राजीं !
परि पाय वाजती पाचोळ्यावर सुकल्या—
ये प्रकाश, काढी हात गळ्यांतिल गडणे !
जन लज्जेस्तव गे ! जरा आपणा मरणे ! !

वरूड, दि. ८-८-५१

## ओघ नदीचा संथ रुपेरी

ओघ नदीचा—
संथ रुपेरी
चमक चमकतो ऐन दुपारीं
चकाकणाऱ्या पाण्यावरती
क्रीडा करितें कुणी जलपरी !

हळूं गुडुकल्या—
करती नाजुक
लवचिक ल्व्हाळया तिज साजुक
उठे शिरशिरी अंगालागुन...
...पंख पसरतो वरी धवल बक

ओघ नदीचा—
संथ रुपेरी :
छाया शामल साठवून उरिं !
दो बाजुंनी रेतीची कड :
उमटे तीवर ओले पाउल

पर्ण, फुलांचीं झाली पडझड...
आणि पाउलें होताती जड !

पाठर, दि. ७–१०–५६

## तूंच मायेचा माणूस

उरांतील वेदनांनी
व्याकुळतो जीव माझा
मिळेल रे ! कधीतरी
येथोनिया मज रजा !

खैर निव्यामुळें जसा
देतां, पोळतसे पाय
तसेंच हें हृदयहि
करीतसे हाय हाय !

सभोवती पाखडली
तप्त फाल्गुनी ही आग
येणार रे ! केव्हांतरी
तुला प्राणेश्वरा ! जाग ?

गरीबींत राया ! माझ्या
तूंच मायेचा माणूस
जोंधळ्यांत अवचट
दिसे वागीचें कणीस !

तुझ्या भेटीची मजला
बहु दिवसांची आस !
आंता घेतला रे ! राया
तुझा रातदिन ध्यास ! !

वरूड, धुलिवंदन-दिन ५२

## तो गाव राहिला

तो गाव राहिला एका हांकेवर--
लागलें प्रथम मज आंब्याचें वावर
टाकला लवण मीं मागें, आलों वरी
तों दिसे दृष्टिला गढि नाका सामुरी...
अन् हृदयीं झाली कालवाच कालव
जाहला नको तो वेळेवर आठव !--
--"त्या गढींत वाडा देशमुखांचा भला
पाटील गावचे मान तया लाभला
नच हिंग परंतू वास आज राहिला--
ती गेली वतनें--काळ किती लोटला !
"जान्हवी" तयांची एकुलती एकटी
पोरगी गोरटी--जिची सिंहसम कटी
गालावर फुलल्या गोकर्णीच्या कळ्या
रतिलाहि लाजविल-जणुं कीं बहिणी जुळ्या
एकाच घोकली पाठांतिल अक्षरें !
"जान्हवी, जान्हवी"-पुस्तकांत स्वाक्षरें
दोघांनी मिळुनी खावा एकच डबा
आमचा न कोणा कधी कळे मन सुबा !
हें असेंच गेले दिन कांही कापरी !--
नी जाणिव जागे, नूतन अमुच्या उरीं...
...निर्व्याज हांसणे लोप पावले तिचें--
घे जागा त्याची लज्जा, भीती सुचें !
आडून बोलणें, सभोवती पाहणें...

आवाज दबकता--नेत्रांची भाषणें !
--तें दुर्मिळ झालें आतांशा दर्शन
जे एकेवेळीं मम होते जीवन !
साताठ दिसांतुनि भेटीचा योग ये :
मग आणाभाका, हास्य, आणि आसवें !
हें असेंच गेलें दिन कांही गंधित—
अन् पडे निच्यावर नकळत मज अक्षत !
--हें जपुनि ठेविलें दुःख कोपऱ्या मधीं
तें असेंच होते अबोध जागे कधी !!

* * *

हें घरासमोरिल मारुतिचे मंदिर--
पाहतां, भंगले स्वप्न अति सुंदर !
नच जरी जहाली स्वप्नांची पूर्तता
...पण लाभतसे सुख आणिक मज धन्यता !
परि वास्तव देते दुःखाच्या डागण्या...
ह्या लागतसे अन् अहोरात्र जोगण्या !!
मीं एक मागतों देवाला मागणे--
"विसर पाड माझा तिला"--
न असले जिणे !!

वरूड, दि. ३-११-५५

## मुका मार !

नको असलेल्या काही आठवणी
उराशी बाळगून जगतो आहे–
उरले सुरले कसे बसे हें
निर्जिव जीवन !
––पानांचा चोथा पिक गिळून
फेकल्या प्रमाणें !

आतुरले कान ऐकाया निनाद :
आणि अधीर अधर– द्यावयाला साद
नेत्रीं अवयव जाहले गोळा
बघावयाला तुझ्या मुखीचा
अपरूप सोहळा ! !

पण वाट पाहून शिणले लोचन
मरगळल्या भावना मेल्या वासना
माझ्या सोबतीला
अजून देखील आहे आशा
कुठे कोपऱ्यांत दडून
––काळ्या मेघखंडांत वीज जाते
उजळून !

पण एकच क्षण :
अन् पुन्हा फिरून अंधार :
जाणवतो भीषण भयानक
आणि त्याला असते एक
वेगळीच धार !
हृदयायाच्या कोपऱ्यांत : घुसते आरपार ?
अन् नेहमीच होतो असह्य
असा हा मुका मार !!
जगतो जीवन पुन्हा :
आणि झेलतों शिरावर वार :
--वारा वर वार !!

वरूड, दि. ९-६-५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23011 दि. 3/04
क्रमांक 1770 दि. 6/04

# अशीच होती रात्र काजळी

अशीच होती रात्र काजळी
चमकत नव्हती एकहि तारा
उरे व्यापुनी गार गारवा
होता वाहत उधाण वारा !

अशीच होती रात्र काजळी
जांभुळलेली मुग्ध पश्चिमा
पेंगुळलें जग निद्रेनें अन्
जागत होतों मीच निकामा !

अशीच होती रात्र काजळी
कोठेही नच किंचित् कुजबुज
असे शांतता नीरी नीरव
पण मिचकावी नेत्र पथीं विज !

मुंबई

## मूकच तूं पण—

किती विनवलें तुला जरी मीं
मूकच तूं पण.....

नुचललीस तव मान निमिषभर
किंचित हि वर !

उकरलीस तूं जमिन नखाग्रें-
निश्चल राहुन उभी तिथे पण
किती विनवले तुला जरी मी
मूकच पण तूं...

फुला फुलांच्या साडीशी तरि
किती करावा उगीच चाळा
आंबाड्यांतिल केतकी पाते
कशा अकारण तें चाचपणें-
तीन तीनदा !

डोळ्यांतिल जांभळें सभोंती...
काव्यांतिल ती लोभस भाषा
पडते को ती !

किती विनवले तुला जरी मी
मूकच तूं पण...

फिरविलीस तूं मान एकदां–
आणि गेलीस–

निघुनि अचानक वायूवेगें...
बघत राहिलों––

पाठमोरि तव आकर्षकशी तशी आकृती !
अनिमिष नेत्रें––
नी पुटपुटलो :

"किती विनवले तिला जरी मी
मूकच ती पण !"

* * *

हस्ताचें तें थेंब टपोरे
ओघळली सर...

सुवर्णवर्खीं न्हाली अवघी
वसुंधरा अन् लगेच नंतर !
किंचित कोठे क्षितिजापाशी
जवस फुलां चें–
डेलियांच्या पुष्पा परि तें–
उभे जरी ढग !

--अवचित  ओघळले त्या--
हस्ताच्या त्या सरी-परी तूं
मला भेटली !

डांबर रस्ता होता निर्जिव--
जणूं पडावे मृत जिवाणू !
उरांत खळबळ...लाज मुखावर...
तरि ही फुटले उसने (?) हांसू...
म्हणालीस तूं-
"किती-तरी दिवसांनी पडते, गांठ अचानक !"
--मम देहींचा उडुनी गेला :
कीर बोलका !

पुन्हा म्हणालिस :
"मूक असें कां, आठवतेना ?
ती...ती अपुली...भेट तधीची !"
...मीं नच वदलों, जीभ बोलली :
मला न कळता--
"कुठे, कुठे...ते...काय म्हणालिस..."

वरूड, दि. ३०-९-५६

## एकदांच !

येते तशी एकदांच.....
घडी अमोल सुखाची
बरसात चांदण्यांची !

आज जरी वैभवांत
दिसे लोळतों खुशाल
दुःख वाटचाला विशाल !

तोंच ओढा, तोंच पूल......
तुझ्या हातीं माझा हात
लाख चांदण्यांची रात !

"नको अशी विटंबना
तुझ्या नशिबीं फिरून
भर वैशाखाचें ऊन !

पैसा, प्रतिष्ठा नि मान
मला जेव्हां भूषविलं
तोंवरी ना थांबशिल ?"

"फार वेळ ठेवूं नको
तुझी पाहात रे, वाट !"
—मला आठवते नीट !!

...इथे विसावतों थोडा
माझ्या मनाचा चंडोल
हाच ओढा, हाल पूल !

एकदांच जीवनांत
येते अनमोल घडी
--माझ्या मनीं आसवेडी !

पिंपळखुटी, दि. ३०-८-५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमत.
अनुक्रम 23811 दि: 03/64
क्रमांक 1090 नोंः दिः 8/64

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 1096
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# सृजन

काजळलें मेघ
अंधारलें अवकाश...
आणि बिजलीचा सुरूं पदन्यास...
आषाढांतील वर्षेची
ओघळली सर--
काळोचा पालटे एकाकी नूर !

--पोपटी, हिरव्या...कोंभा कोंभांनी...
अंकुरली सारी !!

नागपूर, दि. १-१-१९५८

REFBK-0010589
REFBK-0010589

## आमची प्रकाशनें :

१ माझी चाळीस भावंडं

प्रा. भाऊ मांडवकर.

∴

२ सृजन

कवि : वसंत गिरटकर

∴

३ पानोळचा

कवि : भाऊ मांडवकर

∴

## आगामी

१ सहकार ( कथा )

कु. सरोज देशपांडे

आणि

प्रा. भाऊ मांडवकर



श्री गिरटकरांच्या कवितेचा एक विशेष म्हणजे तिच्या अभिव्यक्तींतलें नवेंपण व निराळेंपण ! अत्याधुनिक कवितेचें अनुकरण हें त्याचें कारण नसून खेड्यांतलें त्यांचें जीवन त्यास कारणीभूत असावें. अर्थात् हें नवेंपण व निराळें-पण त्यांनी निसर्गाचीं जीं शब्दचित्रें चितारलीं आहेत त्यांत प्राचुर्यानें प्रत्ययास येतें.

शब्दकळा हा तर त्यांच्या कवितेचा एक रमणीय विशेष सांगता येईल...

*   *   *

य काव्य
क. १४७७

# पंचगव्य

[ राजकीय विडंबन काव्य ]

आचार्य अत्रे
दत्तु बांदेकर

REFBK-0010043
REFBK-0010043

प्रकाशन क्रमांक १६६

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबअी ४

मूल्य अडीच रुपये

ग. पां.
परचुरे प्रकाशन मन्दिर